# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 33/2024 दिनांक : 23.01.2024

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**1)लिंबगाव :–** दिनांक 21.01.2024 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरा समोरील अंगणात मौ. सायाळ ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून शेतातील पपईचे झाड मोडण्याच्या कारणावरून फिर्यादीचे पाठीत खंजरने चार वेळा वार करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी माधव संभाजी धुमाळ, वय 25 वर्षे, व्यवसाय शेती रा. सायाळ ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 11/2024 कलम 307, 294, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री केजगीर, मो.क्रं. 8830763211** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–** दिनांक 21.01.2024 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, **जुन्या रिमांड होमचे गेटचे समोर सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे मित्र तेथील वॉचमॅन रफिक भाई यांन बोलत बसले असता यातील नमद आरोपीने जुन्या भांडणात फुटलेला मोबाईल दुरूस्ती करूण देण्याच्या कारणावरून शेख इरफान शेख गुडु यास डावे बाजुस गळयाजवळ तसेच शेख इरफान शेख गौस यास डोक्यात व फिर्यादीचे पोटात त्याचे जवळील लोखंडी खंजरने मारून खुन करण्याचा प्रयत्न केला. व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मोहम्मद अजझर मोहम्मद निसार, वय 32 वर्षे, व्यवसाय सौदागर हॉटेल येथे वस्ताद रा. नई आबादी मगदुमनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 28/2024 कलम 307, 323, 504, 506, भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो.क्रं. 9403546846** हे करीत आहेत.

## 2)मो.सा.चोरी :–

**वजिराबाद :–** दिनांक 19.01.2024 रोजी चे 18.00 वा. ते 19.45 वा. चे दरम्यान, डॉक्टरलाईन **येथील कर्मवीर हॉस्पीटल समोरील सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पलेंडर प्रो कास्ट कंपणीची काळया रंगाची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/एबी–2895 किंमती 30,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी दिपक भाऊराव भाकरे, वय 22 वर्षे, व्यवसाय खा. नौकरी रा. ह. मु. जुना कौठा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 34/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री केंद्रे, मो.क्रं. 9970380147** हे करीत आहेत.

## 3)गळफास घेवुन आत्महत्या :–

**मुदखेड :–**दिनांक 22.01.2024 रोजी चे 04.00 वा. चे पुर्वी, **मयताचे राहाते घराचे पाठीमागे अंगणात सिताफळाच्या झाडास मौ. डोणगाव ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे मुकींद पि. गोविंद हामंद, वय 41 वर्षे, व्यवसाय शेती रा. डोणगाव ता. मुदखेड जि. नांदेड,** यांचेवर बँक ऑफ बडोदा व स्टेट बँक ऑफ इंडिया या दोन्ही बँकेचे दोन लाख रूपये शेतीचे कर्ज असल्याने व बँक ऑफ बडोदयाची नोटीस आल्याने कर्ज कसे फेडावे या तणावातुन सिताफळाच्या झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार विश्वंभर पि. गोविंद हामंद, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. डोणगाव ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मुदखेड** आ. मृ. **01**/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री शिंदे, मो.नं. 9579613649** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 34/2024 दिनांक : 23.01.2024**

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"नेताजी सुभाषचंद्र बोस"** आणि **"बाळासाहेब ठाकरे"** यांची जयंती साजरी

दिनांक 23 जानेवारी, 2024 मंगळवार रोजी **"नेताजी सुभाषचंद्र बोस"** आणि **"बाळासाहेब ठाकरे"** यां थोर पुरूषांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी **"नेताजी सुभाषचंद्र बोस"** आणि **"बाळासाहेब ठाकरे"** या थोर पुरूषांस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री उदय खंडेराय**, पोनि स्थागुशा, **श्री महादेव पुरी**, सपोनि पोलीस नियंत्रण कक्ष, नांदेड यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार व कार्यालयीन स्टाफ उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **सपोउपनि/श्री सुर्यभान कागणे**, यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपले।
तो ची साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।